महाराष्ट्र शासन

क्रमांक : पीएमसी-२०१०/प्र.क्र. [illegible]/२०१२/नवि-२२
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३० मार्च, २०१२

प्रति,
आयुक्त,
पुणे महानगरपालिका,
पुणे.

विषय :- पुणे महापालिका ज्युनिअर ग्रेड लेखनिक या पदाच्या निवडीबाबतचा महासभा ठराव. क्र २१७ दि. २७.९.२०१० ~~[illegible]~~ विखंडीत करणेबाबत.

संदर्भ :- आपले पत्र क्र. सआ/से/४०१२ दिनांक ३.२.२०१२

महोदय,

उपरोक्त विषयबाबतचे आपले संदर्भाधीन पत्र कृपया पहावे.

२. पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ज्युनिअर ग्रेड लेखनिक (वर्ग-३) या प्रवर्गातील रिक्त जागा भरण्याबाबत विहित मार्गाचा अवलंब करुन १६५ पदासाठीची निवड यादी व ३६ पदांसाठीची अतिरिक्त उमेदवारांची यादी तयार करण्यात आली. सदर निवडयादीचा विषय महानगरपालिकेच्या विधी समिती मार्फत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३४ (३) नुसार मुख्य सभेच्या मान्यतेसाठी पाठविली असता मनपा मुख्य सभेचे ठराव क्र.२१७ दि. २७.९.२०१० अन्वये कोणतेही संयुक्तीक कारण न देता दफ्तरी दाखल केला आहे.

३. महानगरपालिकेची वाढणारी व्याप्ती सेवकवर्गाची कमतरता व पुन्हा नव्याने रिक्त जागा भरणे प्रक्रिया राबविण्यासाठी लागणारा कालावधी व मनुष्यबळ या बाबी विचारात घेऊन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४४८ मधील तरतुदीनुसार आपणास कळविण्यात येते की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत प्रस्तुत प्रकरणाचा विषय महासभेपुढे अधिनियमातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात यावा.

प्रस्तुत प्रकरणी घेतलेला निर्णय तात्काळ शासनास अवगत करावा.

आपला,

(आ.श्री. जिवने)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
नगर सचिव, पुणे महानगरपालिका, पुणे.
निवड नस्ती (नवि-२२)